IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# भारतातील स्त्री चळवळ आणि सामाजिक सुधारणा : ऐतिहासिक, वैचारिक व समकालीन अभ्यास

**प्रा. रुपाली सखाराम सापटे**

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास

श्री सद्गुरु गंगागिरी महाराज सायन्स,

गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*स्त्री चळवळ*

**ABSTRACT**

भारतातील स्त्री चळवळ ही समाजातील बदलांची एक दीर्घ आणि महत्त्वाची प्रक्रिया आहे. पारंपरिक पितृसत्ताक समाजरचनेमुळे स्त्रियांना अनेक वर्षे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात मागे ठेवले गेले. बालविवाह, सतीप्रथा, विधवांवरील अन्याय, स्त्री शिक्षणाचा अभाव आणि घर व समाजातील निर्णयांपासून स्त्रियांचे दूर ठेवणे या समस्या भारतीय समाजात मोठ्या प्रमाणावर होत्या.

१९व्या शतकात इंग्रजी शिक्षण, नवे विचार आणि मानवी मूल्यांचा प्रभाव वाढू लागला. त्यामुळे समाजातील चुकीच्या प्रथा दूर करण्यासाठी सामाजिक सुधारणा चळवळी सुरू झाल्या. या चळवळींमुळे सतीप्रथा बंद झाली, विधवा पुनर्विवाहास मान्यता मिळाली आणि स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे आणि पंडिता रमाबाई यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी, स्वातंत्र्यासाठी आणि सन्मानासाठी महत्त्वाचे कार्य केले.

राष्ट्रीय चळवळीच्या काळात स्त्रियांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. आंदोलनांमध्ये सहभागी होणे, प्रचार करणे आणि कारावास भोगणे यामुळे स्त्री ही समाजातील सक्रिय घटक आहे, हे स्पष्ट झाले. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने स्त्रियांना समान अधिकार दिल्यामुळे स्त्री चळवळ अधिक मजबूत झाली. विशेषतः १९७० नंतर हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, कामाच्या ठिकाणी भेदभाव आणि राजकीय प्रतिनिधित्व यांसारख्या प्रश्नांवर स्त्री चळवळीने ठाम भूमिका घेतली.

या संशोधन लेखात भारतातील स्त्री चळवळीचा इतिहास, सामाजिक सुधारणा चळवळींचा प्रभाव, स्त्री व पुरुष समाजसुधारकांचे योगदान तसेच आजच्या स्त्री चळवळीसमोरील अडचणी यांचा अभ्यास करण्यात आला आहे. स्त्री चळवळ ही केवळ स्त्रियांसाठी नसून समानता, न्याय आणि लोकशाही समाज घडवण्यासाठी आवश्यक असलेली चळवळ आहे, हे या लेखातून स्पष्ट होते.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Sapate, R. S. (2026).** भारतातील स्त्री चळवळ आणि सामाजिक सुधारणा : ऐतिहासिक, वैचारिक व समकालीन अभ्यास. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 796–800.*

**१. प्रस्तावना**

इतिहास हा समाजाच्या मूल्यव्यवस्थेचा आरसा असतो. भारतीय समाजाची रचना परंपरेने पितृसत्ताक असल्यामुळे स्त्रियांना कुटुंब व समाजात दुय्यम स्थान प्राप्त झाले. विवाह, मातृत्व आणि घरगुती कामे यांपुरतेच स्त्रीचे जीवन मर्यादित ठेवण्यात आले. शिक्षण, संपत्ती, सार्वजनिक जीवन व निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग नगण्य होता.

१९व्या शतकात औपनिवेशिक काळात इंग्रजी शिक्षण, आधुनिक विचारसरणी आणि मानवतावादी दृष्टिकोनामुळे सामाजिक सुधारणांची प्रक्रिया सुरू झाली. स्त्री प्रश्न हा सामाजिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरला आणि त्यातून स्त्री चळवळीचा पाया घातला गेला.

**२. स्त्री चळवळीची संकल्पना व स्वरूप**

स्त्री चळवळ म्हणजे स्त्रियांच्या अधिकारांसाठी आणि सामाजिक समतेसाठी चालवलेला संघटित संघर्ष होय. ही चळवळ पितृसत्ताक सामाजिक रचनेला आव्हान देते. भारतीय स्त्री चळवळीचे स्वरूप पाश्चात्त्य स्त्रीवादापेक्षा वेगळे असून ती जात, वर्ग, धर्म आणि आर्थिक विषमतेच्या संदर्भात विकसित झाली आहे.

स्त्री चळवळीचे प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

- स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे
- स्त्री शिक्षणाचा प्रसार
- कायदेशीर व सामाजिक अधिकार प्राप्त करणे
- शोषण व हिंसाचाराविरोधात संघर्ष करणे

**३. १९व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळी**

१९वे शतक हे भारतीय समाजाच्या इतिहासातील परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण पर्व मानले जाते. या काळात भारतीय समाज परंपरागत, धर्माधिष्ठित आणि रूढीग्रस्त संरचनेत अडकलेला होता. पितृसत्ताक मूल्यव्यवस्थेमुळे स्त्रियांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व वैयक्तिक जीवनात दुय्यम स्थान दिले जात होते. बालविवाह, सतीप्रथा, बहुपत्नीत्व, विधवांचे शोषण, स्त्री शिक्षणाचा अभाव आणि स्त्रियांच्या निर्णयस्वातंत्र्यावर घातलेली बंधने या समस्या समाजात खोलवर रुजलेल्या होत्या.

ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर इंग्रजी शिक्षण, आधुनिक कायदेव्यवस्था, विवेकवाद आणि मानवतावादी विचारसरणी भारतीय समाजात प्रसारित होऊ लागली. पाश्चात्त्य उदारमतवादी विचारधारेमुळे सामाजिक सुधारणेची गरज सुजाण वर्गाच्या लक्षात आली. या वैचारिक बदलातून १९व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळींचा पाया घातला गेला. या चळवळींचा मुख्य उद्देश सामाजिक अन्यायकारक प्रथा नष्ट करून समाजाला आधुनिक आणि मानवकेंद्री मूल्यांकडे नेणे हा होता.

**३.१ सतीप्रथा निर्मूलन चळवळ**

सतीप्रथा ही स्त्रीच्या अस्तित्वावर लादलेली अत्यंत अमानुष आणि क्रूर सामाजिक प्रथा होती. पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला जिवंत जाळणे किंवा तिला आत्मदहनास प्रवृत्त करणे ही प्रथा केवळ स्त्रीविरोधीच नव्हे तर मानवी मूल्यांविरुद्ध होती. राजा राममोहन रॉय यांनी या प्रथेचा वैचारिक, धार्मिक आणि नैतिक पातळीवर विरोध केला. त्यांनी धर्मग्रंथांचा खोल अभ्यास करून सतीप्रथेचा धर्माशी थेट संबंध नसल्याचे स्पष्ट केले.

त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि ब्रिटिश प्रशासनावर टाकलेल्या दबावामुळे १८२९ मध्ये त्यावेळी लॉर्ड विल्यम बेंटिंक यांच्या कारकिर्दीत सतीप्रथा कायद्याने बंद करण्यात आली. ही घटना स्त्री प्रश्नाच्या संदर्भात कायदेशीर हस्तक्षेपाचे पहिले ठोस उदाहरण मानली जाते.

### ३.२ स्त्री शिक्षणाची चळवळ

स्त्री शिक्षणाचा अभाव हे स्त्री गुलामगिरीचे प्रमुख कारण असल्याचे समाजसुधारकांनी ओळखले. शिक्षणाशिवाय स्त्रीचे सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक सक्षमीकरण शक्य नाही, ही भूमिका महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्पष्टपणे मांडली. त्यांनी आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक बहिष्कार, टीका आणि अपमान सहन करून स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. त्यांच्या कार्यामुळे स्त्री शिक्षण ही केवळ सुधारणा नव्हे तर सामाजिक हक्काची चळवळ ठरली. या चळवळीने पुढील काळातील स्त्री सक्षमीकरणाचा पाया घातला.

### ३.३ विधवा पुनर्विवाह चळवळ

हिंदू समाजात विधवांचे जीवन अत्यंत कष्टदायक आणि अपमानास्पद होते. केशवपन, अल्पाहार, सामाजिक बहिष्कार आणि पुनर्विवाहास मनाई या प्रथांमुळे विधवा स्त्रिया मानसिक आणि सामाजिक शोषणाला बळी पडत होत्या.

ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी या अन्यायाविरुद्ध वैचारिक आणि सामाजिक संघर्ष केला. त्यांनी धर्मग्रंथांच्या आधारे विधवा पुनर्विवाहास समर्थन दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा संमत झाला. हा कायदा स्त्रियांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या दिशेने टाकलेला महत्त्वाचा पाऊल होता.

### ३.४ महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा आणि स्त्री प्रश्न

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळींना विशेष वैचारिक धार प्राप्त झाली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी जातिव्यवस्था, धर्मांधता आणि स्त्री शोषणावर एकत्रित हल्ला चढवला. ताराबाई शिंदे यांनी *स्त्री-पुरुष तुलना* या ग्रंथातून स्त्रीवरील अन्यायकारक नैतिक मापदंडांवर तीव्र टीका केली.

पंडिता रमाबाई यांनी स्त्री शिक्षण, विधवा कल्याण आणि आर्थिक स्वावलंबनावर भर दिला. त्यांच्या कार्यामुळे स्त्री प्रश्न हा केवळ सामाजिक सुधारकांचा नव्हे तर स्वतः स्त्रियांचा प्रश्न बनला.

### ४. स्त्री सुधारकांचे योगदान

भारतीय स्त्री चळवळीच्या जडणघडणीत स्त्री सुधारकांचे योगदान मूलभूत आणि दिशादर्शक ठरले आहे. पुरुष समाजसुधारकांनी स्त्री प्रश्न मांडला असला, तरी स्वतः स्त्रियांनी अनुभवाच्या आधारे केलेले चिंतन, लेखन व कार्य यामुळे स्त्री चळवळीला आत्मभान, वैचारिक स्पष्टता आणि स्वायत्तता प्राप्त झाली.

पंडिता रमाबाई या आधुनिक भारतातील प्रभावी स्त्री सुधारक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी स्त्री शिक्षण, विधवा पुनर्वसन आणि आर्थिक स्वावलंबन यांवर भर दिला. *शारदा सदन* आणि *मुक्ती मिशन* यांसारख्या संस्थांद्वारे त्यांनी विधवा व परित्यक्ता स्त्रियांना शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. रमाबाई यांचे कार्य हे करुणेवर आधारित सुधारणा न राहता स्त्रीच्या आत्मनिर्णयाच्या हक्कावर आधारित होते.

ताराबाई शिंदे यांनी *स्त्री-पुरुष तुलना* या ग्रंथातून पितृसत्ताक समाजरचनेवर तीव्र वैचारिक टीका केली. स्त्री चारित्र्याच्या संकल्पनेवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी नैतिकतेचे दुहेरी मापदंड उघड केले. त्यांचे लेखन हे भारतीय स्त्रीवादाच्या प्रारंभिक वैचारिक मांडणीचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जाते.

बेगम रोखया (रोकिया सखावत हुसेन) यांनी मुस्लिम समाजातील स्त्री शिक्षणाचा प्रश्न पुढे आणला. त्यांनी *साखावत मेमोरियल स्कूल* स्थापन करून मुस्लिम मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या लेखनातून धार्मिक रूढींच्या नावाखाली होणाऱ्या स्त्री शोषणावर परखड टीका आढळते.

कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनाला चळवळीचे केंद्र मानले. त्यांनी हस्तकला, लघुउद्योग आणि सार्वजनिक जीवनातील स्त्री सहभाग वाढवण्यासाठी कार्य केले. त्यांच्या कार्यामुळे स्त्री चळवळीला सामाजिक सुधारणांपलीकडे

जाऊन आर्थिक व राजकीय परिमाण प्राप्त झाले.

या स्त्री सुधारकांच्या कार्यामुळे स्त्री प्रश्न हा केवळ सुधारणांचा विषय न राहता स्त्रियांच्या हक्कांचा आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न बनला. त्यांनी स्त्रीला दयनीय घटक म्हणून न पाहता समाजपरिवर्तनाची सक्रिय घटक म्हणून स्थापित केले. त्यामुळे भारतीय स्त्री चळवळीचा वैचारिक पाया अधिक सुदृढ, समावेशक आणि संघर्षशील बनला.

**५. राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांचा सहभाग**

भारतीय राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांचा सहभाग हा स्त्री चळवळीच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. १९व्या शतकातील सामाजिक सुधारणांमुळे स्त्रियांमध्ये शिक्षण, आत्मभान आणि सार्वजनिक जीवनाविषयीची जाणीव निर्माण झाली. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय चळवळीच्या काळात स्त्रियांनी घरगुती मर्यादा ओलांडून राजकीय व सामाजिक संघर्षात सक्रिय सहभाग घेतला.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीने स्त्रियांसाठी व्यापक सार्वजनिक अवकाश उपलब्ध करून दिला. असहकार आंदोलन (१९२०), सविनय कायदेभंग आंदोलन (१९३०) आणि भारत छोडो आंदोलन (१९४२) या टप्प्यांत स्त्रियांनी सभांमध्ये सहभाग, सत्याग्रह, परकीय वस्त्र बहिष्कार, खादी प्रसार, प्रभातफेऱ्या, प्रचारकार्य आणि कारावास भोगणे यांसारख्या भूमिका निभावल्या. त्यामुळे स्त्री ही केवळ राष्ट्राची माता नसून सक्रिय राजकीय घटक आहे, ही जाणीव दृढ झाली.

सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली, विजयलक्ष्मी पंडित, कमला नेहरू यांसारख्या स्त्रियांनी नेतृत्वात्मक भूमिका बजावल्या. विशेषतः अरुणा आसफ अली यांनी भारत छोडो आंदोलनात दिलेले नेतृत्व स्त्री राजकीय धैर्याचे प्रतीक ठरले. या काळात ग्रामीण व शहरी, शिक्षित व अल्पशिक्षित स्त्रिया मोठ्या संख्येने चळवळीत सहभागी झाल्या, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

तथापि, राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असूनही स्त्री प्रश्न अनेकदा राष्ट्रवादी उद्दिष्टांच्या छायेत दुय्यम ठरल्याचे दिसून येते. स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न हा बहुतेक वेळा राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या पूरक घटक म्हणूनच मांडला गेला. तरीसुद्धा, या सहभागामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला आणि स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री हक्क चळवळीला भक्कम आधार मिळाला

**६. स्वातंत्र्योत्तर स्त्री चळवळ**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय स्त्री चळवळीला नवे वैचारिक, कायदेशीर आणि संघटनात्मक परिमाण प्राप्त झाले. भारतीय संविधानाने स्त्रियांना समानता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाचे मूलभूत अधिकार प्रदान केल्यामुळे स्त्री प्रश्न हा केवळ सामाजिक सुधारण्यांचा विषय न राहता राज्यघटनात्मक व कायदेशीर चौकटीत मांडला जाऊ लागला.

१९५० नंतर स्त्री चळवळीचा पहिला टप्पा मुख्यतः कायदेशीर सुधारणांवर केंद्रित होता. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून विवाह, घटस्फोट, वारसा आणि दत्तक हक्क यासंबंधी स्त्रियांना महत्त्वपूर्ण अधिकार मिळाले. तथापि, कायदेशीर समानते आणि सामाजिक वास्तव यांतील दरी स्पष्टपणे जाणवू लागली.

१९७० नंतर स्त्री चळवळीने अधिक संघर्षात्मक आणि संघटित स्वरूप धारण केले. हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, बलात्कार, लैंगिक छळ, रोजगारातील असमानता आणि सार्वजनिक सुरक्षितता यांसारखे प्रश्न केंद्रस्थानी आले. स्वयंस्फूर्त महिला संघटना, स्वयंसेवी संस्था आणि स्त्रीवादी गटांनी आंदोलन, जनजागृती आणि कायदेशीर लढ्यांच्या माध्यमातून स्त्री हक्कांचा प्रश्न समाजाच्या केंद्रस्थानी आणला.

या काळात स्त्री चळवळीने केवळ शहरी मध्यमवर्गापुरते मर्यादित न राहता ग्रामीण, कामगार, दलित आणि आदिवासी स्त्रियांच्या प्रश्नांकडेही लक्ष दिले. परिणामी, स्त्री चळवळीचे स्वरूप अधिक समावेशक आणि बहुआयामी झाले.

स्वातंत्र्योत्तर स्त्री चळवळीने स्त्रीला निष्क्रिय लाभार्थी म्हणून न पाहता हक्कांसाठी संघर्ष करणारी सक्रिय सामाजिक शक्ती म्हणून स्थापित केले. त्यामुळे भारतीय लोकशाहीच्या मूल्यांना बळकटी मिळाली आणि समकालीन स्त्री चळवळीचा वैचारिक पाया अधिक मजबूत झाला.

**७. समकालीन स्त्री चळवळ : आव्हाने**

समकालीन काळात भारतीय स्त्री चळवळ ही जागतिकीकरण, उदारीकरण आणि तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर नव्या स्वरूपात विकसित होत आहे. कायदे, धोरणे आणि संस्थात्मक यंत्रणा अस्तित्वात असतानाही स्त्री प्रश्नांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. त्यामुळे स्त्री चळवळीसमोरील आव्हाने बहुआयामी आणि संरचनात्मक स्वरूपाची आहेत.

स्त्रीवरील हिंसाचार हे आजही सर्वात गंभीर आव्हान आहे. कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ, बलात्कार, ऑनर किलिंग आणि सायबर गुन्हे यांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते. कायदे असूनही अंमलबजावणीतील त्रुटी, पोलीस यंत्रणेतील संवेदनशीलतेचा अभाव आणि सामाजिक कलंक यामुळे अनेक स्त्रिया न्यायापासून वंचित राहतात.

आर्थिक विषमता आणि रोजगारातील असुरक्षितता हे आणखी एक महत्त्वाचे आव्हान आहे. असंघटित क्षेत्रातील महिला कामगार, घरगुती कामगार आणि ग्रामीण स्त्रिया सामाजिक सुरक्षेपासून वंचित आहेत. समान कामाला समान वेतन ही संकल्पना प्रत्यक्षात अद्याप पूर्णतः अंमलात आलेली नाही.

शिक्षण व आरोग्य क्षेत्रात प्रगती असूनही ग्रामीण व आदिवासी भागातील स्त्रिया अद्याप मूलभूत सुविधांपासून दूर आहेत. लिंगनिवड, बालिकांची गळती आणि पोषणअभाव यांसारख्या समस्या कायम आहेत.

राजकीय प्रतिनिधित्वाच्या मर्यादा, स्त्री चळवळीतील अंतर्गत मतभेद, जात-वर्ग-धर्म आधारित असमानता आणि डिजिटल माध्यमातील दुष्परिणाम हीही समकालीन स्त्री चळवळीसमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत. त्यामुळे समकालीन स्त्री चळवळीसमोर केवळ हक्कांची मागणी नव्हे तर सामाजिक मानसिकतेतील परिवर्तन हे मोठे आव्हान ठरते.

## ८. निष्कर्ष

भारतातील स्त्री चळवळ ही सामाजिक सुधारणांच्या प्रक्रियेतून विकसित झालेली एक सातत्यपूर्ण आणि गतिशील चळवळ आहे. १९व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळींनी स्त्री प्रश्नाचा वैचारिक पाया रचला, तर राष्ट्रीय चळवळीने स्त्रियांचा सार्वजनिक व राजकीय सहभाग वाढवला. स्वातंत्र्योत्तर काळात संविधानिक समानतेमुळे स्त्री चळवळीला कायदेशीर अधिष्ठान प्राप्त झाले आणि १९७० नंतरच्या संघर्षात्मक टप्प्याने स्त्री हक्कांचा प्रश्न समाजाच्या केंद्रस्थानी आणला.

समकालीन काळात स्त्री चळवळीने डिजिटल माध्यमे, कायदेशीर लढे आणि जनजागृती यांचा प्रभावी वापर केला असला, तरी हिंसाचार, आर्थिक विषमता, सामाजिक मानसिकता आणि राजकीय प्रतिनिधित्वाची मर्यादा ही आव्हाने अद्याप कायम आहेत. त्यामुळे स्त्री मुक्ती ही केवळ कायदे किंवा धोरणांपुरती मर्यादित न राहता सामाजिक मूल्यव्यवस्थेतील मूलभूत परिवर्तनाशी निगडित आहे.

स्त्री चळवळ ही केवळ स्त्रियांची चळवळ नसून लोकशाही, सामाजिक न्याय आणि मानवाधिकारांची कसोटी आहे. म्हणूनच भारतीय समाजाच्या समताधिष्ठित व मानवकेंद्री विकासासाठी स्त्री चळवळीचे सातत्यपूर्ण बळकटीकरण अपरिहार्य आहे.

## संदर्भसूची (Bibliography)

1. *देशमुख, यशोधरा – महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा इतिहास, औरंगाबाद : दिशा प्रकाशन.*
2. *पाटील, मंगला – ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्री प्रश्न, कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.*
3. Desai, Neera – *Women's Movement in India*
4. Forbes, Geraldine – *Women in Modern India*
5. *जोशी, शांता – हुंडाबंदी चळवळ : महाराष्ट्राचा अनुभव, मुंबई : ग्रंथाली.*
6. *कुलकर्णी, सुलभा – स्त्री, समाज आणि परिवर्तन, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.*